१६ ते ३१ जानेवारी २०२० । किमत २५ रु.
(एकूण पृष्ठे ५२)

# परिवर्तनाचा वाटसरू

# हा भारत नव्हे...




M.G. Arts, Science & late N.P. Commerce College * Armori *

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

परिवर्तनाचा
# वाटसरू

वर्ष १९वे / अंक १८वा / किं. २५ रु. / १६ ते ३१ जानेवारी २०२०

**संस्थापक संपादक**
अभय कांता*

**संपादक**
प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**व्यवस्थापकीय संपादक**
प्रशांत पवार

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**
अवधूत डोंगरे, प्रज्वला तट्टे, वीरा राठोड, कलीम अजीम, मधुरी सामंत, अजित अभंग, राही श्रु. ग., वृषाली मगदूम

**सहव्यवस्थापक**
शुभम जाधव

**संपर्क पत्ता**
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ७०२८२०२०९२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ४५० रु., त्रैवार्षिक : १२०० रु., दशवार्षिक : ३,५०० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. ३५० रु., सॉफ्ट + छापील ६५० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर लिस्ट ग्रुप डीमध्ये परिवर्तनाचा वाटसरू पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमाच्या अंतर्गत (अ. क्र. १५) समावेश केला आहे.



G.W. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# अ नु क्र म


संपादकीय ५

**इपीडब्ल्यूची पानं**

राजकीय भविष्यसूचकतेमधील जोखीम ७
कर्जमाफी हा दीर्घकालीन उपाय नव्हे ८
झारखंडमधून मिळालेला संदेश १०
उत्तर प्रदेशात कायद्याची कसोटी १२
जीएसटी भरपाई देण्यासंदर्भातील पेच १३

**समसामायिक**

*नव्या संकटाची नांदी* १६
विजय दिवाण
अखेर विद्यार्थी का संतापले? १८
सतीशकुमार पडोळकर

**झोत**

कारसंस्कृती आणि सार्वजनिक अवकाश २२
विद्याधर दाते अनु. अवधूत डोंगरे

**कविता**

प्रज्ञा दया पवार ४१
मोहन देस ४२

**अनुवादित कविता**

अनुपमा तिवाडी अनु. भरत यादव ४२

**पुस्तक परीक्षण**

अर्वाचीन कवींचा काव्यविचार ४३
विजय रैवतकर
भवतालातील भय अधोरेखित... ४६
सीमा मुसळे



अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.





M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# अर्वाचीन कवींचा काव्यविचार

विजय रैवतकर

पद्मगंधा प्रकाशन, पुणे द्वारा डॉ. हेमंत खडके यांचा 'अर्वाचीन कवींचा काव्यविचार' हा प्रकाशित केला गेलेला ग्रंथ म्हणजे मराठी साहित्यसमीक्षेतील साहित्यसमीक्षेचा वस्तुपाठ घालून देणारा ग्रंथ होय. खडके यांनी या पुस्तकातून वाङ्मयीन कलाकृतीच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या विविध प्रश्नांच्या अंगाने काव्यविचाराची अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. काव्यलेखनात काव्यविषयक विचारांचा झालेला अंतर्भाव याची तपशीलवार चिकित्सा करणारा त्यांचा सदर ग्रंथ आहे.

खडके यांनी ग्रंथाच्या सुरुवातीलाच काव्यविचाराची संकल्पना स्पष्ट केली असून नंतर संस्कृत, प्राचीन आणि मध्ययुगीन काव्यविचाराच्या स्थित्यंतराची स्थूल मांडणी करून अर्वाचीन कवी म. मो. कुंटे, कवी केशवसुत, भा. रा. तांबे, कवी बी, माधव जूलियन आणि कवी अनिल ह्यांच्या काव्यविषयक विचारांतील अंत:सूत्रे तपशीलवारपणे उलगडून दाखविली आहेत.

खडके यांनी संस्कृत काव्यविचाराचे 'वाक्य रसात्मक काव्यं', प्राचीन-मध्ययुगीन काव्यविचाराचे 'भक्तिरसात्मक काव्यं' आणि संत काव्यविचाराचे 'सामाजिक-आध्यात्मिक आणि नैतिक' सूत्र प्रतिपादित केले आहे. संतकवी काव्याला जीवनाच्या कसोट्या लावू शकले. कवीच्या समाजाभिमुख आणि नैतिक कृति-उक्तीला या काव्यविचारात महत्त्व प्राप्त झाले. संत कवींच्या काव्यविचाराचे केंद्र मात्र ईश्वर, मोक्ष, मुक्ती असे पारलौकिकच राहिले आहे, हे त्यांचे संत काव्यविचाराचे निरीक्षण आहे.

खडके यांनी काव्यविचाराचा ऐतिहासिक तपशील मांडत अर्वाचीन कवींच्या काव्यविचाराचे निराळेपण स्पष्ट केले. धार्मिक हेतू आणि आध्यात्मिक अनुभूती व्यक्त करणारे संत काव्य, धार्मिक हेतूंची पूर्तता करतानाच कल्पनाचमत्कृतीवर भर देणारे पंडिती काव्य, रंजन करण्यासाठी निर्माण झालेले इंद्रियनिष्ठ शृंगारप्रधान शाहिरी काव्य या तीनही काव्यप्रणालीत वा यातील काव्यव्यापारापेक्षा अर्वाचीन कवींचा काव्यविचार पृथगात्म कसा ठरतो, याचे अभ्यासपूर्ण स्पष्टीकरण त्यांनी केले.

काव्यनिर्मितीचे प्रयोजन, काव्यनिर्मितिप्रक्रिया, बांधिलकी (कवी आणि काव्याच्या संदर्भात), काव्याचे स्थान (सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाच्या संदर्भात), काव्याची महत्ता, काव्याचा आस्वाद, काव्यातील शब्दसामर्थ्य, काव्यस्फूर्तीचे गमक, काव्यनिर्मितीतील अडचणी आणि समस्या, काव्यकलेचा उद्भव, काव्यातील सौंदर्यस्थळे,

लेखक आरमोरी (जि. गडचिरोली) स्थित महात्मा गांधी महाविद्यालयामध्ये मराठीचे सहायक प्राध्यापक आहेत.
इमेल- viju.raiwatkar@gmail.com



M.G. Arts, Science & late N.P Commerce College ★Armori★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli